**शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा**

-----------------------------------

**मानपाडा  शाळेत शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांनी साधला विद्यार्थीशी संवाद**

**ठाणे दि १७ जून २०१९ :**  शाळेच्या दरवाजाला बांधलेले पाना-फुलाचे तोरण, गोडधोड जेवणाची पंगत, गावातील नागरिकांची ये-जा, ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांची काढलेली मिरवणूक, शाळेच्या आवारात काढलेली नक्षीदार रांगोळी,  रंगेबिरंगी फुग्यांनी  केलेली शाळेची सजावट असं आल्हाददायी वातावरण आज ( सोमवार ) जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पाहायला मिळालं. निमित्त होते जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा.

उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर आज जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळा सुरु झाल्या असून त्यानिमित्ताने प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी नव्याने दाखल झालेल्या आणि पुढील इयत्तेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत केले. या प्रवेशोत्सवाला शाळा समितीचे पदाधिकारी, अधिकारी, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते. तसेच पहिल्याच दिवशी ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांनी कल्याण तालुक्यातील मानपाडा शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला.

आज विद्यार्थांना मोफत पाठयपुस्तकं वाटप करण्यात आली. तसेच दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करून पालकांशी संवाद साधण्यात आला. त्याच बरोबर शालेय व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात आली. ठाणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंजुषा जाधव, उपाध्यक्ष सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा प्रवेशोत्सवाची तयारी शिक्षकांनी १३ जून पासूनच करण्यात आल्याची माहिती शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांनी दिली.




